# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०१५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक ०९ एप्रिल, २०१५ / चैत्र १९, १९३७ ( शके )**

| | |
|---|---|
| **(१) शालेय शिक्षण,क्रिडा आणि युवक कल्याण, उच्च व तंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२) अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, अन्न आणि औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री** | |
| **(३) पर्यावरण मंत्री** | |
| **(४) पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३८**

---

### राज्यात सर्व शिक्षा अभियानांतर्गत पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना दिली जाणारी पुस्तके परस्पर भंगारात विकत असल्याबाबत

**(१) * ३७९७ श्री.विजय गिरकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्व शिक्षा अभियानांतर्गत पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना दिली जाणारी पुस्तके त्यांच्यापर्यंत पोहचत नसून ही पुस्तके शाळांमधील काही लोक परस्पर भंगारात विकत असल्याचे दिनांक १४ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अभियानाचा शिक्का असलेली पुस्तके शहरातल्या काही भंगारवाल्याकडे मिळाल्याचे आढळून आले, हे ही खरे आहे काय,

(३) त्याचप्रमाणे सदर रद्दीवाले स्वत:च मोठया बुकस्टॉल धारकांना गाठून परस्पर पुस्तके विकत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, त्यानुसार विद्यार्थ्यांना पुस्तकांपासून वंचित ठेवणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) सर्व शिक्षा अभियान अंतर्गत विद्यार्थ्यांना वाटप करण्यासाठी ठाणे जिल्ह्यातील भिवंडी - निजामपूर महानगरपालिकेच्या शाळेमध्ये आलेली काही पुस्तके भंगारात विकण्यात येत असल्याची बाब निदर्शनास आली आहे.
(३), (४) व (५) सदर प्रकरणी चौकशी करण्यात येत आहे. संबंधित शाळेतील विद्यार्थ्यांना पाठयपुस्तके उपलब्ध करुन देण्यात आली आहेत.

-----------------

**उच्च प्राथमिक विभागातील प्रशिक्षित पदवीधरांच्या वेतनश्रेणीबाबत**

**(२) * ३२६२ श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दिनांक १३ फेब्रुवारी, २०१३ च्या शासन निर्णयानुसार उच्च प्राथमिक शाळांसाठी (६ वी ते ८ वी) प्रशिक्षित पदवीधर शिक्षक नेमण्याची तरतूद करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सेवेत असलेल्या अपदवीधरांना पदवीधर होण्याच्या अटीतून वगळण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सेवेत कायम असलेल्या अपदवीधर शिक्षकांना ६ वी ते ८ वीसाठी समायोजन न करता त्यांना अतिरिक्त ठरविण्याची कारणे काय आहेत,
(४) उच्च प्राथमिक शाळेतील सर्व प्रशिक्षित पदवीधरांना प्रशिक्षित पदवीधरांची वेतनश्रेणी लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे काय, असल्यास केव्हा,
(५) जिल्हा परिषदेच्या सर्व उच्च प्राथमिक शिक्षकांना पदवीधर वेतनश्रेणी मिळत असून त्याच धर्तीवर माध्यमिक शाळांमधील ६ वी ते ८ वीच्या वर्गासाठी काम करणाऱ्या प्रशिक्षित पदवीधरांना पदवीधर शिक्षकाची वेतनश्रेणी न देण्याची कारणे काय आहेत,
(६) महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे कार्यध्यक्ष व कोकण विभाग शिक्षक मतदार संघाचे लोकप्रतिनिधींनी दिनांक ४ जुलै, २०१४ रोजी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने काय निर्णय घेण्यात आला आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) नाही.

(३) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ च्या अनुषंगाने इयत्ता ६ वी ते ८ वी करिता पदवीधन शिक्षक नेमण्याची तरतूद करण्यात आली आहे. अतिरिक्त ठरणाऱ्या अपदवीधर शिक्षकांच्या सेवा समाप्त न करता त्यांचे समायोजन इयत्ता १ ली ते ५ वी या वर्गांवर करण्यात येते.

(४) नाही.

(५) व (६) उच्च प्राथमिक व माध्यमिक शाळेतील इयत्ता ६ वी ते ८ वीला शिकविणाऱ्या प्रशिक्षित पदवीधर शिक्षकांना पदवीधर प्राथमिक शिक्षकांची वेतनश्रेणी देय आहे. मात्र त्यांना पदवीधर शिक्षकाची वेतनश्रेणी लागू करण्यात आली नाही.

-----------------

**राज्यात अनुदानित शैक्षणिक संस्थांमधील कर्मचा-यांना**
**वरिष्ठ वेतन श्रेणीचा लाभ देण्याबाबत**

**(३) * २८८७ डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासकीय कर्मचाऱ्यांना २४ वर्षे सेवा पूर्ण केल्यानंतर वरिष्ठ वेतन श्रेणीचा लाभ मिळतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुदानित शैक्षणिक संस्थांमधील कर्मचा-यांना (शिक्षकेत्तर) शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन श्रेणीचा लाभ मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वरिष्ठ वेतनश्रेणीमध्ये तफावत असण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, अनुदानित शैक्षणिक संस्थांमधील कर्मचा-यांना (शिक्षकेत्तर) शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन श्रेणी देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप, याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) सदर बाब शासन स्तरावर विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शासकीय तंत्रनिकेतनमध्ये कार्यरत कंत्राटी अधिव्याख्यात्यांच्या सेवा नियमित करणेबाबत**

**(४) * ३७७३ श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश गजभिये, डॉ.सुधीर तांबे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अमरसिंह पंडित, श्री.ख्वाजा बेग, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक २१९२९ ला दिनांक १६ डिसेंबर, २०११ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय तंत्रनिकेतनमध्ये कार्यरत कंत्राटी अधिव्याख्यात्यांच्या सेवा नियमित करणेबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने शासनाने केलेल्या कार्यवाहीचे स्वरुप काय आहे,

(२) उपरोक्त प्रकरणी अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची सविस्तर कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर यांनी याचिका क्र. २०४६/२०१० मध्ये दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने मा.सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका क्र.३९०१४/२०१३ वर दि.०६/०१/२०१५ रोजी दिलेल्या आदेशानुसार याचिकेतील ९१ याचिकाकर्त्यांपैकी दि. १५/१०/२०१३ रोजी कंत्राटी सेवेची ३ वर्षे पूर्ण केलेली व अद्याप कार्यरत असलेल्या ६२ कंत्राटी अधिव्याख्यात्यांच्या सेवा शासन निर्णय क्र. न्यायाप्र-२०१०/प्र.क्र.११०/२०१० (ब)/तांशि-७, दि. १४/०१/२०१५ अन्वये नियमित करण्यात आल्या आहेत. तसेच शासन निर्णय क्र. न्यायाप्र-२०१०/प्र.क्र.११०/२०१० (ब)तांशि-७, दि. २३/०१/२०१५ अन्वये सेवा नियमित करण्यात आलेल्या ६२ अध्यापकांची पदस्थापना करण्यात आलेली आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात पाहिली ते आठवी पर्यंतचे सर्वच विद्यार्थी पास करण्याच्या धोरणामूळे विद्यार्थ्यांची गुणवत्ता कमी झाल्याबाबत**

**(५) * ३२०८ श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पाहिली ते आठवी पर्यंतचे सर्वच विद्यार्थी पास करण्याच्या शासनाच्या धोरणामुळे शैक्षणिक गुणवत्ता खूपच कमी होत असल्याचे माहे जानेवारी २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शैक्षणिक गुणवत्ता कमी होत असल्यामुळे या धोरणात बदल करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथे नियमित अधिष्ठातांची नेमणूक करण्याबाबत**

**(६) * २६९६ श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर हे आशिया खंडातील सर्वात मोठे रुग्णालय आहे, हे खरे आहे काय
(२)शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे किती जणांना प्रभारी चार्ज देण्यात आला आहे
(३) असल्यास, सदर रुग्णालयात नियमित अधिष्ठातांची नेमणूक होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर हे राज्यातील एक मोठे शासकीय रुग्णालय आहे.
(२) सात शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात रिक्त असलेल्या अधिष्ठाता पदांवर सात सेवाजेष्ठ प्राध्यापकांना अतिरिक्त कार्यभार देण्यात आलेला आहे.
(३) कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात कायम विनाअनुदानातील अशासकीय व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम शासनामार्फत राबविण्याबाबत**

**(७) * ३९४६ श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, डॉ.सुधीर तांबे, श्री.अनिल भोसले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.प्रकाश गजभिये, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग, श्री.धनंजय मुंडे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कायम विनाअनुदानातील अशासकीय व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम खाजगी संस्थामार्फत राबविण्यात येत आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संस्था अनुदान पात्र करण्यासाठी शासनाने दिनांक ३ सप्टेंबर, २०१३ रोजीच्या आदेशान्वये आवश्यक ती माहिती शासनाकडे जमा केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर माहिती जमा करुन कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्याचे स्वरुप काय,

(५) तसेच सदर कायम विनाअनुदानित अशासकीय व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम शासनामार्फत राबविणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) होय.

(३), (४) व (५) व्दिलक्षी अभ्यासक्रम राबविणा-या कायम विनाअनुदानित अशासकीय संस्थांना अनुदानित तत्वावर परवानगी देण्यात येत नसल्याने अनुदानास पात्र करण्याची कार्यवाही करण्यात आली नाही.

-----------------

**ग्रामपंचायत देवली (खुर्द) अंतर्गत मौजा टाकळी येथील महिलांनी आमच्या हक्काचे रेशन आमच्याच गावात वितरीत करण्याची केलेली मागणी**

**(८) * ४००९ श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामपंचायत देवली (खुर्द) अंतर्गत मौजा टाकळी येथील रेशन कार्ड धारक महिलांनी संघटीत होऊन आमच्या हक्काचे रेशन आमच्याच गावात वितरीत करा अशी मागणी कुही तहसिल कार्यालयावर मोर्चा नेऊन प्रशासनाकडे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महिलांच्या मागणीस न्याय मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत, ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय,

(२) मौजा टाकळी ता.कुही येथे अन्न धान्याचे वाटप करण्याबाबत संबंधित परवानाधारकास सूचना देण्यात आलेल्या असून, त्यानुसार मौं.टाकळी येथे अन्न धान्याचे वाटप सुरळीत सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील प्रयोगशाळा सहाय्यकांना वरिष्ठ वेतन श्रेणीतील ग्रेड पे देण्याबाबत**

**(९) * ३३७३ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमधील लिपिक आणि ग्रंथपाल यांना सहाव्या वेतन आयोगानुसार वरिष्ठ वेतनश्रेणी मिळत असून प्रयोगशाळा सहाय्यकांना वरिष्ठ वेतनश्रेणीतील ग्रेड पे मिळत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त वेतनश्रेणीमधील त्रुटी दूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाचे धोरण काय आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**घरगुती गॅस ग्राहकांच्या विविध समस्यांबाबत**

**(१०) * २८३३ डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ०१ जानेवारी, २०१५ पासून घरगुती गॅस ग्राहकांच्या बँक खात्यात थेट अनुदान जमा करण्याच्या योजनेतंर्गत गॅस ग्राहकांना अनेक अडचणी व समस्यांना तोंड द्यावे लागत असल्याचे दिनांक ०७ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वडीलांच्या नावावर असलेले गॅस कनेक्शन ट्रान्सफर करणेसाठी पुन्हा अडीच ते पाच हजार रुपये डिपॉझीटची मागणी काही गॅस एजन्सीकडून करण्यात येत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ज्या ग्राहकांनी माहे डिसेंबर, २०१४ च्या अखेरच्या आठवडयात सिलेंडरचे बुकींग केले तर त्यातील बहुसंख्य ग्राहकांना सिलेंडर मिळाले नाही, वा नंतर ते बाजारभावानेच खरेदी करावे लागले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अनुदान थेट बँकेत जमा करण्यामुळे या प्रक्रियेत पारदर्शकता येणार असली तरी मिळणारे अनुदान आणि अदा केलेली रक्कम यात जवळपास ५०-६० रुपयांचा फरक असून त्याचा भार ग्राहकांवरच पडत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मोबाईलद्वारे सिलेंडर बुकींग करतांना सॉफ्टवेअरच्या तांत्रिक बिघाडातून ग्राहकांना येणा-या अडचणीचे निराकरण होऊन योजनेत सुसूत्रता येणेचे दृष्टीने पुढे कोणती उपाययोजना करण्यात येत आहे वा येणार आहे ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.

(२) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(३) हे खरे नाही.

(४) सद्य:स्थितीत गॅस कंपनीच्या धोरणानुसार एलबीटी व व्हॅट या कराच्या रकमा गॅस धारकांना भरावा लागत असल्यामुळे २० ते २४ रुपयांचा फरक दिसून येत आहे.

(५) किरकोळ स्वरुपाच्या तांत्रिक अडचणी निदर्शनास आल्या. त्यावर Manual बुकींगची पर्यायी व्यवस्था उपलब्ध करुन अडचणींचे निरसन करण्यात आले आहे.

-----------------

**रत्नागिरी जिल्हयातील विद्यार्थ्यांना शिष्यवृतीचा लाभ देण्याबाबत**

**(११) * ३११२ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयात शासनाकडून विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्तीच्या अनुदानाची रक्कम शासनाने निधी उपलब्ध करुन न दिल्यामुळे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली नसल्याची बाब माहे जानेवारी २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निधी उपलब्ध करुन न देण्याची कारणे काय आहेत,

(३) उपरोक्त प्रकरणी विद्यार्थ्यांना तात्काळ शिष्यवृत्ती मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) विद्यार्थ्यांना त्वरीत शिष्यवृत्ती मिळण्याच्या दृष्टीने बँक खात्याची अचूक माहिती संचालनालयास उपलब्ध होण्यासाठी ऑनलाईन सॉफ्टवेअर उपलब्ध करून देण्यात आले आहे. ऑनलाईन माहिती भरताना येणा-या अडचणी दूर करण्यासाठी शिक्षणाधिकारी व विभागीय शिक्षण उप संचालक यांच्या बैठका व कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या होत्या. त्यानुसार शिक्षणाधिकारी, गट शिक्षणाधिकारी यांनी विशेष मोहीम राबवून विद्यार्थ्यांची बँक खात्याची माहिती ऑनलाईन प्राप्त करून घेतली आहे. पात्र विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर शिष्यवृत्तीची रक्कम जमा करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी बँकेमध्ये खाते शून्य शिलकीवर उघडत असल्यामुळे व शिष्यवृत्ती रक्कम प्राप्त होताच ती बँकेतून काढली जात असल्याने अशा प्रकारची खाती उघडण्यासाठी बँका सहकार्य करत नाहीत. विद्यार्थ्यांच्या पालकांकडून बँक खात्याची माहिती अचूक आणि विहीत वेळेत मिळत नाही. शाळांकडून प्राप्त झालेली माहिती अचूक नसते. बँक खात्याच्या माहितीमध्ये चूका असल्यास संचालनालयाकडून माहिती पुन्हा शिक्षणाधिकारी माध्यमिक यांचेमार्फत गट शिक्षण अधिकारी यांना पाठविली जाते व दुरुस्त खात्याची माहिती पुन्हा त्याच क्रमाने संचालनालयाकडे येते. त्यामुळे विलंब होतो.

-----------------

## वैद्यकीय महाविद्यालयातील औषधी दुकानांबाबत

**(१२) * २७१० श्री.मितेश भांगडिया, श्री.अनिल सोले :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गरीब रुग्णांना सवलतीच्या दरात औषधी सुविधा उपलब्ध करण्याकरीता १४ वैद्यकीय महाविद्यालयात खाजगी दुकानदारांना औषधी दुकान लावण्याची अनुमती देण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सर्व दुकानांमध्ये कोणत्याही रुग्णाला औषधांमध्ये कोणत्याही प्रकारची सवलत दिली जात नाही, तसेच जेनेरीक औषधी उपलब्ध करण्याबाबत सक्ती करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या दुकानदारांना सवलत देण्याकरीता कडक सक्तीचे धोरण लागु करण्याबाबत तसेच संबंधितांविरुध्द सवलत न दिल्यास कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२) व (३) विभागाच्या नियंत्रणाखालील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुगालयामध्ये औषधी दुकाने सुरु करण्यासाठी महाराष्ट्र कॉ.ऑप.कन्झ्युमर्स फेडरेशन लि.मुंबई या शासन मान्य सहकारी संस्थेस जागा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदर दुकानांमध्ये रुग्णांना औषधांमध्ये किंमतीवर ५ टक्के सुट दिली जाते. बृन्हमुंबई विभागातील विभागाच्या नियंत्रणाखालील रुग्णांलयातील औषधी दुकानांमध्ये जेनेरिक औषधे उपलब्ध करुन देण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**माध्यमिक शाळांमधील तबला व संगीत शिक्षकांच्या वेतनश्रेणीतील तफावत दूर करण्याबाबत**

**(१३) * २७७० श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माध्यमिक शाळांमध्ये कार्यरत तबला वादक हे पद शिक्षक संवर्गात येत असून त्यांना शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची वेतनश्रेणी देण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संगीत शिक्षक व तबलावादक यांची शैक्षणिक पात्रता समकक्ष असूनही दोघांच्या वेतनश्रेणीत तफावत करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(३) तसेच एच.एस.सी. संगीत विशारद ही शैक्षणिक पात्रता असतानाही त्यांना त्रिस्तरीय वेतनश्रेणी लागू करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, तबला व संगीत शिक्षकांच्या वेतनश्रेणीतील तफावत दूर करुन त्यांना त्वरीत न्याय देण्याची मागणी नागपूर विभागाच्या जनप्रतिनिधींनी दिनांक ३१ डिसेंबर, २०१४ रोजी शासनाकडे पत्र पाठवून केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही.

(३) नाही.

(४) व (५) प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अंबड (जि.नाशिक) येथील औद्योगिक वसाहतीतील कंपन्या पाणी नाल्यात सोडत असल्यामुळे कारवाई करण्याबाबत**

**(१४) * ४२६२ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड, डॉ.सुधीर तांबे, श्री.रामहरी रुपनवर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबड (जि.नाशिक) येथील औद्योगिक वसाहतीतील कंपन्या ड्रेनेजचे पाणी नाल्यात सोडत असल्यामुळे परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने नाल्यात ड्रेनजचे पाणी सोडणा-या कंपन्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यातील अतिरिक्त शिक्षकांना शिक्षणाधिका-याकडून नेमणूकीचे आदेश दिल्याबाबत

**(१५) * ४२९६ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील अतिरिक्त शिक्षकांना शिक्षणाधिका-यांकडून नेमणूकीचे आदेश देण्यात येवूनही बहुतांश संस्था चालकांनी त्या शिक्षकांना अद्यापी हजर करून घेतले नसल्यामुळे, शिक्षकांना पगार मिळाला नसल्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती गंभीर झाली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अतिरिक्त शिक्षकांना संस्थामध्ये त्वरीत सामावून घेण्याबाबत तसेच अतिरिक्त शिक्षकांना सेवेत सामावून घेण्यास नकार देणा-या संस्थावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे. सोलापूर जिल्ह्यातील अतिरिक्त ठरलेल्या काही शिक्षकांना नेमणूकीचे आदेश देण्यात येवूनही काही संस्था चालकांनी त्यांना हजर करुन घेतलेले नाही. मात्र अतिरिक्त ठरलेल्या कोणत्याही शिक्षकाचे वेतन रोखण्यात आलेले नाही.

(२) व (३) अतिरिक्त शिक्षकांना सामावून घेण्यास नकार देणाऱ्या संस्थांच्या शाळेतील सदरची रिक्त पदे व्यपगत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**मुंबई महानगरपालिकेच्या उर्दू माध्यमाच्या शाळांमध्ये संगणक प्रयोग शाळा सुरु करण्यासाठी शासनाने दिलेला निधी पडून राहिल्याबाबत**

**(१६) * ४३४६ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अल्पसंख्याक मुलांच्या शिक्षणाअंतर्गत उर्दू माध्यमाच्या उच्च माध्यमिक १२ शाळांमध्ये संगणक प्रयोगशाळा सुरु करण्यासाठी राज्य शिक्षण विभागाने पाठविलेला २७ लाख रुपयांचा निधी दीड वर्षाहून अधिककाळ मुंबई महापालिकेकडे वापराविना पडून आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत राज्याच्या शिक्षण उपसंचालकांनी अनेकवेळा पालिकेच्या शिक्षण अधिकाऱ्यांना स्मरणपत्रे पाठवूनसुध्दा कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने निधीचा वापर न करणा-या संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) अद्याप, कारवाई करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) नाही.

(३), (४) व (५) सर्व शिक्षा अभियानांतर्गत मुंबई महानगरपालिकेच्या १२ उर्दु शाळांमध्ये संगणक प्रयोगशाळा निर्मितीसाठी सन २०१३ मध्ये २७.१२ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन दिला होता. तथापि, दर कराराची यादी जानेवारी २०१४ मध्ये उपलब्ध झाली असून त्यानुसार फेब्रुवारी २०१४ मध्ये विविध संस्थांकडून दरपत्रके मागविण्यात आली असून त्यास अद्याप महानगरपालिकेने मान्यता दिलेली नाही. सन २०१५-१६ मध्ये प्रत्येक शाळेला संगणक प्रयोगशाळा इंटरनेटसहित देण्याचा नियोजन आहे. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने उर्दु माध्यमाच्या शाळांमध्ये २०० कॉम्प्यूटर लॅब तयार केलेल्या आहेत.

-----------------

## सुरगाणा (जि.नाशिक) येथे प्रजासत्ताकदिनी सार्वजनिक धान्य वितरणातील धान्य जप्त केल्याबाबत

**(१७) * ४८०९ श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुरगाणा (जि.नाशिक) येथे दिनांक २६ जानेवारी, २०१५ रोजी प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी साडेपाच कोटी रुपयांचे सार्वजनिक धान्य वितरणातील साखर, गहू, तांदुळ इ.वस्तु बाजारात परस्पर विक्रीसाठी जात असतांना जप्त करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सार्वजनिक धान्य वितरणातील हे हिमनगाचे टोक असून या प्रकरणामुळे राज्यातील रेशनचे धान्य गुजरातमध्ये विकणारी टोळी कार्यरत असल्याचे स्पष्ट झाल्याचे निदर्शनास आले, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार संबंधितांवर शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीश बापट :** (१) सुरगाणा (जि.नाशिक) येथील शासकीय गोदामात ३०,६८२.१७ क्विं. अन्नधान्याचा अपहार झाल्याचे निदर्शनास आल्याने दिनांक २६ जानेवारी, २०१५ रोजी पोलीस स्टेशन सुरगाणा येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) नाही.

(३) व (४) सुरगाणा, जि.नाशिक येथील शासकीय गोदामात जिल्हा पुरवठा कार्यालयाच्या लेखा तपासणी पथकाच्या अहवालानुसार २१५५७.४० क्विं. गहू ९०५१.७७ क्विं. तांदूळ व ७३ क्विं. साखर असे एकूण ३०६८२.१७ क्विं. अन्नधान्य पुस्तकी साठ्याच्या तुलनेत कमी आढळून आले आहे. सदर प्रकरणी अपहारात प्रथमदर्शनी सहभागी आढळून आलेले गोदामपाल, सुरगाणा, वाहतूक ठेकेदार व त्यातील भागीदार, वाहतूक प्रतिनिधी, नाशिक रोड/अंबड, पुरवठा निरीक्षक व तहसिलदार, सुरगाणा यांचे विरुध्द पोलीस स्टेशन, सुरगाणा येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस तपास सुरु आहे. अपहारास जबाबदार असणारे संबंधित गोदामपाल, वाहतूक प्रतिनिधी, पुरवठा निरीक्षक व तहसिलदार, सुरगाणा यांना निलंबित करण्यात आले असून त्यांच्या विभागीय चौकशीच्या प्रस्तावाबाबत कार्यवाही सुरु आहे. तसेच सदर अपहारात प्रथमदर्शनी सहभागी असलेले वाहतूक ठेकेदार मे.एस.एन.मंत्री यांचे कंत्राट

निलंबित करण्यात आलेले असून सदर वाहतुक कंत्राटास दिलेली मुदतवाढ दि. ०६.०२.२०१५ पासून संपुष्टात आणलेली आहे. अपहारास प्रत्यक्ष जबाबदार असलेल्या सर्व संबंधितांकडून अपहारित धान्याची रक्कम ईकॉनॉमिक कॉस्टने वसूल करण्याचे लेखी निर्देश जिल्हाधिकारी, नाशिक यांना दिले आहेत.

-----------------

**मराठी माध्यमाच्या शाळेचे बंद करण्यात आलेले अनुदान सुरू करण्याबाबत**

**(१८) * ५५१३ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्राथमिक व माध्यमिक मराठी माध्यमाच्या शाळांना अनुदान देण्याचे शासनाने बंद केले असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सर्व शाळांमधील शिक्षण संस्थांचे संचालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी शाळांचे अनुदान पुर्ववत चालू ठेवावे म्हणून संबंधित शिक्षणाधिकारी, शिक्षक संचालक व प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांचेकडे माहे जानेवारी, २०१५ च्या दुस-या आठवड्यात लेखी निवेदने दिली आहेत, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, मराठी माध्यमाच्या शाळांना अनुदान बंद करण्याचे निश्चित कारण काय आहे तसेच त्या शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी त्याचप्रमाणे संबंधित शाळांमधील विद्यार्थी यांचे भवितव्याबाबत शासनाची भूमिका काय आहे,

(४) तसेच सदर शाळांना अनुदान देण्याबाबत सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

**पालघर जिल्हयातील तानसा खाडीजवळील साडी प्रिंटींग कंपनी**
**तून रंगीत रसायन थेट नदीपात्रात सोडत असल्याबाबत**

**(१९) * ६०३६ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयातील वसई-विरार शहराजवळील तानसा खाडीजवळील साडी प्रिंटींग कंपनीतून रंगीत रसायन थेट नदीपात्रात सोडल्याने शेती, मासे व जैविक प्राण्यांचे जीवन धोक्यात असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न क्र.१ व २ नुसार सदर कंपनीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, दिरंगाईची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) होय, हे खरे आहे.

पालघर जिल्ह्यातील वसई-विरार शहराजवळील तानसा खाडी जवळील साडी प्रिटींग कंपनीतून रसायन मिश्रित सांडपाणी थेट नदी पात्रात जात असल्याबाबतचे वृत्त प्रसिध्द झाले होते.
(२) होय.
(३) वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या वृत्ताच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या क्षेत्रीय कार्यालयाने मे. सरिता आर्टस् या उद्योगाची पाहणी केली असता सदर कारखान्यामधून अप्रक्रियाकृत रासायनीक सांडपाणी तानसा खाडी क्षेत्रात थेट जात असल्याचे आढळून आल्याने या कारखान्यास उत्पादन बंदचे आदेश देण्यात आले आहेत. सध्या सदरचा कारखाना बंद आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जळगाव जिल्ह्यात जिल्हा दुध संघासह चाळीसगांव, पाचोरा, पारोळा येथील दुध डेअरीची तपासणी करण्याबाबत

**(२०) * ६०६० श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव जिल्ह्यात जिल्हा दुध संघासह चाळीसगांव, पाचोरा, पारोळा येथील दुध डेअरीची दिनांक ११ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास तपासणी करुन दुधाचे नमुने घेतले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याची चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने पुढे कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) याबाबत अद्याप ही चौकशी पुर्ण झाली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय, दिनांक १८/११/२०१४ रोजी सदर कारवाई करण्यात आलेली आहे.
(२) होय, कारवाईत २६ नमुने तपासण्यात आले. असुरक्षित घोषित झालेल्या नमुन्या संदर्भात ८ डेअ-यांशी संबंधित १४ व्यक्तींविरुध्द पोलिसात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. तर २ डेअ-यांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत.

सदर डेअ-यांनी पदाधित अधिकारी, जळगाव यांचेकडे सदर नमुने फेरतपासणीसाठी रेफरल फूड लॅबोरेटरी, गझीयाबाद यांच्याकडे पाठविण्याकरता अर्ज केले व त्यानुसार हे सर्व नमुने फेरतपासणीसाठी रेफरल फूड लॅबोरेटरी, गझीयाबाद येथे पाठविण्यात आले होते. सदर नमुन्यांचे फेरतपासणी अहवाल प्राप्त झाले असता, ०९ नमुन्यापैकी ०५ कमी दर्जाचे घोषित व ०४ प्रमाणित घोषित झाले. सदर प्रकरणी कमी दर्जाच्या नमुन्यांचे बाबतीत संबंधितांविरुध्द न्यायनिर्णय अधिकारी यांचेकडे खटले दाखल करण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुणे शहरातील स्कूल बसमध्ये महिला मदतनीस उपलब्ध न करणा-या शाळांवर शासनाने कारवाई करण्याबाबत**

**(२१) * ६५०३ श्री.अनिल भोसले, श्री.संदिप बाजोरिया, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील शाळांमधील खाजगी स्कूल बस व व्हॅनमधून प्रवास करणा-या विद्यार्थीनीच्या सुरक्षिततेसाठी स्कूल बसमध्ये महिला मदतनीस अनिवार्य असताना ब-याच बसेसमध्ये महिला मदतनीस नसल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार स्कूल बसमध्ये महिला मदतनीस उपलब्ध न करणा-या शाळांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

प्रस्तुत प्रकरणी प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत गटनिहाय मुख्याध्यापकांच्या बैठका घेऊन बसमध्ये महिला मदतनीसांच्या नेमणूका अनिवार्य आहेत अशा सूचना दिल्या आहेत. तसेच जून २०१५ मध्ये विशेष मोहिम हाती घेऊन स्कूल बसमध्ये महिला मदतनीस उपलब्ध असल्याबाबतची खात्री करण्याबाबतच्या व उचित कारवाई करण्याच्या सूचना आयुक्त, परिवहन म.राज्य, मुंबई यांना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील शिक्षकेत्तरांना कालबध्दी पदोन्न्ती लागू करण्याबाबत**

**(२२) * ३२६५ श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षकांना मिळणाऱ्या वरिष्ठ व निवडश्रेणीप्रमाणे अनुदानित संस्थांमधील शिक्षकेतरांना कालबध्द पदोन्नती योजना लागू होती हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची योजना केव्हापासून कोणत्या शासन निर्णयानुसार रद्द करण्यात आली आहे,

(३) नसल्यास, शिक्षकेतरांना शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे लाभ न देण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**राज्यातील अपंग समावेशीत शिक्षण विशेष शिक्षकांच्या वेतनाबाबत**

**(२३) * २८८१ डॉ.सुधीर तांबे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.विक्रम काळे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.सतिश चव्हाण, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.कपिल पाटील, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.संदिप बाजोरिया, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रशासन पुरस्कृत असलेल्या राज्यातील अपंग समावेशीत शिक्षण (माध्यमिकस्तर) तील विशेष शिक्षकांचे वेतन मागील २४ ते २५ महिन्यापासून देण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र राज्य अपंग समावेशित शिक्षण संघ माध्यमिक यांनी आर.टी.ई. २००९ नुसार विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पुर्णवेळ नियमित विशेष शिक्षकांना नियमित नेमणुका व वेतन देण्याच्याबाबत वारंवार मागणी करण्यात येवूनही अद्यापी शिक्षकांना वेतन मिळाले नसल्याचे माहे जानेवारी २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रलंबित वेतनामुळे ठाणेगाव (जि.नागपूर) येथील श्री.दलाल या शिक्षकांनी आत्महत्या केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू शिक्षकांना नियमित मान्यता व वेतन त्वरीत देण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्‌यापि कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही. या योजनेंतर्गत नियुक्त करण्यात आलेले १९८५ विशेष शिक्षकांपैकी केंद्र शासनाने ३२८ विशेष शिक्षकांचे माहे एप्रिल, २०१४ ते संप्टेंबर, २०१४ पर्यंतचे वेतन अनुदान मंजूर केले असून ते वितरति करण्यात आलेले आहे.

(२), (३) व (४) अपंग समावेशित शिक्षण माध्यमिक स्तर या योजनेतील विशेष शिक्षकांच्या नियुक्त्यांबाबत व एकूणच योजनेच्या अंमलबजावणी संदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्याची कार्यवाही सुरु आहे. केंद्र शासनातर्फे प्राप्त झालेला निधी छाननी अंती पात्र ठरलेल्या विशेष शिक्षकांना मार्च, २०१५ मध्ये वितरित करण्यात आलेला आहे.

श्री.दलाल यांचा मृत्यू रेल्वे अपघातामध्ये झाल्याचे पोलीस तपासात आढळून आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील कायम विनाअनुदानित वरिष्ठ महाविद्‌यालय व एमसीव्हीसी कनिष्ठ महाविद्‌यालयांचा कायम शब्द काढण्याबाबत

**(२४) * ३७५० श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश गजभिये, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.अमरसिंह पंडित, डॉ.सुधीर तांबे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कायम विनाअनुदानित वरिष्ठ महाविद्‌यालय व एमसीव्हीसी कनिष्ठ महाविद्‌यालयाचा कायम शब्द काढावा यासाठी शासनस्तरावर निर्णय घेण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्‌यापि कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) याबाबतचा प्रस्ताव अमान्य केला आहे.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय, नागपूर येथे न्युरोलॉजी विभागाकरिता तज्ञ उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२५) * २६९७ श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय, नागपूर येथे न्युरोलॉजी विभागाकरिता तज्ञांची व यंत्र सामुग्रीची कमतरता आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, न्युरोलॉजी विभागात तज्ञ व यंत्र सामुग्री उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय, नागपूर येथे मज्जातंतूचिकित्सा शास्त्र हा विभाग कार्यान्वित झालेला नसल्याने (E.E.G.) ची व्यवस्था करण्यात आलेली नाही. सदर विभाग कार्यान्वित होण्यासाठी व अंशत: सुरु असणाऱ्या विषयातील डी.एम. व एम.सी.एच. अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी मानकानुसार व गरजेनुसार ३९१ नवीन पदनिर्मितीचा परिपूर्ण प्रस्ताव संचालनालय व संस्थास्तराव तयार करण्यात येत आहे.

-----------------

**औरंगाबाद जिल्ह्यात खरेदी केलेला मका कमी किंमतीत विकल्याबाबत**

**(२६) * ५९६९ श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.संदिप बाजोरिया, डॉ.सुधीर तांबे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे, श्री.अनिल भोसले, श्री.धनंजय मुंडे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हा प्रशासनाने सन २०१३-१४ मध्ये रु. १३६० प्रति क्विंटल हमी भावाने मका खरेदी केला परंतु विक्रीचे अधिकार नसल्याने वर्षभर गोदामात पडून होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तोच मका रु. १०६० प्रति क्विंटल दराने विक्री केल्याने शासनास ७ कोटी रुपयाचा तोटा सहन करावा लागला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने हमी भावाने शेतकऱ्यांचे धान्य खरेदी करणेसाठी व योग्य भावाने विक्री करणेसाठी एकच यंत्रणा असल्यास शासनाचे नुकसान टाळता येते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

आधारभूत किंमत खरेदी योजना ही केंद्र शासनाची योजना आहे. आधारभूत किंमतीचा लाभ होण्याच्या दृष्टीने व शेतकऱ्यांना हमी भावापेक्षा कमी किंमतीने (डीस्ट्रेस सेल) धान्य विकावे लागू नये म्हणून शेतकऱ्यांच्या हिताकरिता राज्यशासनातर्फे धान / भरडधान्य (एफ.ए.क्यू.) खरेदी करण्यात येते.

सदर योजनेअंतर्गत खरीप पणन हंगाम २०१३-१४ मध्ये संपूर्ण राज्यभरात सुमारे ९.५५ लक्ष क्विंटल मका खरेदी करण्यात आला होता. केंद्र शासनाने दिलेल्या निदेशानुसार हा मका जाहिर ई-लिलाव प्रक्रियेव्दारे विक्री करण्यात आला.

सदर योजनेअंतर्गत औरंगाबाद जिल्ह्यात सुमारे १.७० लक्ष क्विंटल मका खरेदी करण्यात आला होता. सदरहू मका जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीव्दारा जाहिर ई-लिलावाव्दारे विक्री करण्यात आला असून त्यास रु. १०६०/- प्रति क्विंटल दर प्राप्त झाला आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांवर होत असलेला अन्याय

**(२७) * ४०१० श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांवर मोठ्या प्रमाणात अन्याय होत असून शिक्षक संघटना संतप्त आहे तेव्हा राज्यातील सन २०१३-१४ च्या विद्यार्थी संस्थेवर आधारित केलेली संच मान्यतेला स्थगिती देण्यासह राज्य शासनाकडून शाळेचे फेर मुल्यांकन रद्द करण्याची मागणी लोकप्रतिनिधी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) व (३) दिनांक १२.२.२०१५ च्या शासन निर्णयान्वये संचमान्यतेबाबत "जैसे थे" परिस्थिती ठेऊन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सुधारित आकृतिबंधाबाबत फेरविचार करण्यासाठी समिती गठीत करण्यात आली आहे. तसेच दिनांक १७.३.२०१५ च्या शासन पत्रान्वये शाळांचे त्रयस्थ समितीमार्फत सुरु असलेले फेरतपासणीचे काम थांबविण्यात आले आहे.

-----------------

**ठाणे व पालघर जिल्ह्यातील इंग्रजी/सेमी इंग्रजी माध्यमाच्या पूर्व प्राथमिक/मॉन्टेसरी शाळांकडे होत असलेले दुर्लक्ष**

**(२८) * ३३७६ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे व पालघर जिल्ह्यात प्रायोगिक तत्त्वावर सुरू झालेल्या इंग्रजी/सेमी इंग्रजी माध्यमाच्या पूर्व प्राथमिक/मॉन्टेसरी शाळांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याने शाळा बंद पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) पूर्व प्राथमिक शिक्षण मजबूत करण्यासाठी सदर शाळा व शिक्षक नियमित करून राज्यभरात हा प्रयोग राबवण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही.

(२) व (३) राज्यातील पूर्व प्राथमिक शिक्षणबाबतचे धोरण निश्चित करण्याची कार्यवाही सुरु आहे. जिल्हा परिषद, ठाणे कडून ही योजना प्रायोगीक तत्वावर राबविण्यात येत आहे. जिल्हा परिषद, ठाणे संचलित प्रायोगिक तत्वावरील पूर्व प्राथमिक शाळा नर्सरी व ज्यु.के.जी. वर्गासाठी मदतनीस व बालवाडीताई यांच्या करार पध्दतीने नेमणूका केलेल्या आहेत. या प्रयोजनासाठी लागणारा खर्च जिल्हा परिषद सेस फंडातून करण्यात येत आहे.

-----------------

**राज्यातील सर्वच विद्यापीठातील अध्यापकांच्या पदोन्नती व वेतनवाढीची प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत**

**(२९) * ५२९९ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक २० ला दिनांक २३ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुंबई विद्यापीठ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ या विद्यापीठातील अध्यापकांच्या पदोन्नती व वेतनवाढीची १९९ प्रकरणे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रलंबित प्रकरणांमधील त्रुटीची पुर्तता करुन पदोन्नती व त्याप्रमाणे वेतननिश्चिती करण्याची सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,
(३) असल्यास, संबंधित १९९ पदोन्नती व वेतनवाढीच्या प्रलंबित प्रकरणांना मान्यता देण्यात आली आहे काय,
(४) नसल्यास, सदरहू कार्यवाही केव्हापर्यंत होणे अपेक्षित आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशतः खरे आहे. ७३ प्रकरणे प्रलंबित होती.
(२), (३) व (४) ७३ प्रकरणांपैकी ५६ प्रकरणांवर कार्यवाही पूर्ण झालेली असून १७ प्रकरणांवर कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**तत्कालीन शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांचे विरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करण्याबाबत**

**(३०) * २७७४ श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले : तारांकित प्रश्न क्रमांक १०७२ ला दिनांक ९ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोगस दस्तावेजाच्या आधारे अनुदानाची शिफारस करणाऱ्या शिक्षण उपसंचालक श्री.महेश करजगांवकर, तत्कालीन शिक्षणाधिकारी (माध्यमिक) श्री.ठमके व तत्कालीन शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, श्री.सोमेश्वर नैताम यांचे विरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करण्याबाबत नागपूर विभागाच्या जनप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री व मा.शालेय शिक्षण मंत्री यांना दिनांक १४ जुलै, २०१४ रोजी पाठवून त्यांचे विरुध्द कारवाई करण्याची मागणी केली होती, हे खरे आहे काय,
(२) तसेच उपरोक्त प्रकरणी उचित कारवाई करण्यासंबंधी सदरहू पत्र तत्कालीन मुख्यमंत्री यांनी दिनांक १ ऑगस्ट, २०१४ रोजी शिक्षण सचिवांकडे पाठविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) कार्यवाही केली असल्यास संबंधितांवर केव्हापर्यंत कारवाई होणे अपेक्षित आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) या प्रकरणी सखोल चौकशी करुन आयुक्त शिक्षण यांचे स्वयंस्पष्ट अहवाल व अभिप्राय मागविण्यात आले आहे. अहवाल प्राप्त होताच नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**अमळनेर तालुक्यात रॉकेलच्या कोटयात केलेली कपात**

**(३१) * ६५८० श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमळनेर (जि.जळगांव) तालुक्यात १८ हजार कुटुंबे गॅस सिलेंडर शिवाय असून तालुक्यात रॉकेलच्या कोटयात कपात केल्याने त्याचे हाल होत असल्याने रॉकेलचा कोटा वाढवून देण्यात यावा अशी मागणी दिनांक २८ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास रॉकेल विक्रेत्यांनी तहसिलदार अमळनेर यांच्याकडे एका निवेदनात केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमळनेर तालुक्यात रॉकेलचा कोटा वाढवून देण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या आहेत,

(३) अद्याप यासाठी कोणत्याच उपाययोजना केल्या नसल्यास, त्यांची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. गिरीश बापट :** (१) रॉकेल कोटा वाढवून मिळण्याबाबत अमळनेर तालुक्यातील किरकोळ केरोसीन परवानाधारकांनी तहसिलदार, अमळनेर यांना दि.२८ जानेवारी, २०१५ रोजी निवेदन दिलेले आहे.

(२) व (३) सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत शिधापत्रिकाधारकांना वितरित करण्यासाठी राज्याच्या केरोसीनच्या मागणीच्या २८% इतके केरोसीनचे नियतन राज्यास प्राप्त होत आहे. त्यामुळे उपलब्धतेच्या प्रमाणात राज्यात मुंबईसह सर्व जिल्ह्यांना केरोसीन नियतन मंजूर करण्यात येते.

राज्याच्या केरोसीन कोट्यात वाढ करण्यासंदर्भात केंद्र शासनाकडे मागणी करण्यात आली असून, त्याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.

-----------------

**शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना अनुदानास पात्र समजणेबाबत**

**(३२) * ३२६० श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विनाअनुदानित वर्ग तुकडयांना मुल्यांकनानुसार अनुदान मंजूर करताना शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी अनुदानास पात्र ठरतात हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक जिल्ह्यामधील वर्ग तुकड्यांना अनुदान देतांना शिक्षकेत्तरांना का वगळण्यात आले आहे,

(३) याबाबत महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे कार्यध्यक्ष व कोकण विभाग शिक्षक मतदान संघाचे लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २१ जानेवारी, २०१४, २१ जानेवारी २०११, २६ एप्रिल, २०११, २९ जुलै, २०१३, १३ जानेवारी, २०१४, ५ मार्च, २०१४, ५ जुलै २०१३, २९ डिसेंबर, २०१२ रोजी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने काय कार्यवाही करण्यात आली आहे,

(४) मा.मुंबई उच्च न्यायालयाने याचिका क्र ७२८३/२०१०, २८३७/२०११, २८३८/२०११ व अन्य याचिकांमधील दिनांक १४ मार्च, २०१३ च्या निर्णयानुसार काय कार्यवाही करण्यात आली आहे,

(५) नसल्यास विलंबाची व न्यायालयीन आदेशाची अवहेलना करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) या सवंर्गातील मंजूर पदे उदा. प्रयोगशाळा सहायक, ग्रंथपाल, अंशकालीन / पुर्णकालीन, वरीष्ठ लिपिक, मुख्य लिपिक व अधिक्षक ही पदोन्नतीची पदे शाळा अनुदानावर आल्यानंतर सुधारीत आकृतीबंधानुसार अनुदानित वर्ग तुकड्यांवरील पटसंख्येवर निर्धारित करुन निश्चित केली जातात.

(३) व (४) सदरहू निवेदनांच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत असून मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालानुसार याचिकादार चार माध्यमिक शाळा व इतर १२ माध्यमिक शाळांमधील एकूण ३३ शिपाई पदे अतिरिक्त होत आहेत. अतिरिक्त पदांमधील ७ अनुदानित पदांपैकी ३ शिपाई पदांचे समायोजन सदर शाळांमध्ये करण्यात आले असून उर्वरीत ४ शिपाई अतिरिक्त पदांचे आवश्यकतेनुसार इतरत्र समायोजन करण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आदिवासी उपाययोजना क्षेत्रातील शाळांचे वेतन देण्याबाबत

**(३३) * २८९३ डॉ.सुधीर तांबे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी उपाययोजना क्षेत्रातील शाळांचे २०१२ पूर्वीचे वेतन थकित असल्याचे माहे जानेवारी २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी आदिवासी उपाययोजना क्षेत्रातील शाळांचे वेतन तातडीने मिळण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,
(३) असल्यास, उक्त थकित वेतन शासन केव्हा अदा करणार आहे,
(४) अद्याप, याबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास त्याची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२) अतिरिक्त वेतन अनुदानाची मागणी सुधारित अंदाजपत्रकात करण्यात येते.
(३) वित्त विभागाची मंजूरी मिळाल्यानंतर थकीत वेतन अदा करणे शक्य होईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**फेरमुल्यांकनात अपात्र ठरलेल्या प्राथमिक व माध्यमिक तसेच वर्गतुकडयांच्या बाबतीत त्रुटी पूर्ण करण्यासाठी करावयाची कार्यवाही**

**(३४) * ३७५६ श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिल भोसले, डॉ.सुधीर तांबे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील फेरमुल्यांकनामध्ये पात्र ठरलेल्या प्राथमिक व माध्यमिक शाळांची व वर्गतुकडयांची जिल्हानिहाय संख्या किती आहे व त्यामधील शिक्षक कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी आर्थिक तरतूद करण्याबाबत शासनस्तरावरून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,
(२) फेरमुल्यांकनात अपात्र ठरलेल्या प्राथमिक व माध्यमिक तसेच वर्गतुकडयांच्या बाबतीत त्रुटी पूर्ण करण्यासाठी शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) उपरोक्त प्रकरणी अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची सविस्तर कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) फेरमुल्यांकनात पात्र ठरलेल्या १६२ विना अनुदानित माध्यमिक शाळांमधील ८१० शिक्षक व ४८२ शिक्षकेत्तर पदांना अनुदानास पात्र घोषित करण्यात आलेले आहे. पात्र शाळांना निधीच्या उपलब्धतेनुसार वेतन तरतुद उपलब्ध करुन देण्यात येईल.

(२) दिनांक १५ नोव्हेंबर, २०११ मधील शासन निर्णयातील अनुक्रमांक १२ नुसार विनाअनुदानित शाळांना तीन वेळा मुल्यांकनाची संधी उपलब्ध आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अतिविशेषोपचार रुग्णालय, शासकीय वैद्यकिय महाविद्यालय नागपूर येथील Blood component व एबीजी मशीनची सुविधा उपलब्ध करण्याबाबत**

**(३५) * ५१०४ श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अतिविशेषोपचार रुग्णालय, शासकीय वैद्यकिय महाविद्यालय नागपूर येथील रक्त पेढी (Blood Bank) मध्ये Blood Component ची सुविधा उपलब्ध नाही तसेच रक्त तपासणीसाठी आवश्यक असणारी एबीजी मशीन नादुरुस्त आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने गोरगरिब जनतेला सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

तथापि शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय हे एकाच संस्थेचे भाग व एकाच परिसरात कार्यरत आहेत. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे रक्तपेढी (**Blood Bank**) कार्यरत आहे. नियमितपणे १६०० **Blood Component** येथे गोळा होतात व ही सुविधा या संस्थेत उपलब्ध आहे. अतिविशेषोपचार रुग्णालयास जेव्हा गरज पडते तेव्हा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथील रक्तपेढीतून ही सुविधा उपलब्ध करुन देण्यात येते व हीच **Model Blood Bank** असून तीला एमसीआय व एफडीए ची मान्यता आहे.

रक्त तपासणीसाठी उपलब्ध असलेल्या २ यंत्रापैकी १ यंत्र नादुरुस्त असले तरी सुरु असलेल्या एका यंत्रावर चाचण्या करण्यात येतात. खरेदी करण्यात आलेल्या किंमतीपेक्षा दुरुस्तीवर अधिक खर्च येत असल्याने यंत्र बंद आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर मध्ये ही सुविधा उपलब्ध आहे.

-----------------

**राज्यातील विशेषत: विद्याविकास विद्यालय, मानखूर्द शाळांना पूर्वलक्षी वेतन अदा करण्याबाबत**

**(३६) * ३३७७ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विद्याविकास विद्यालय, मानखूर्द आणि राज्यातील इतर दहा माध्यमिक शाळा २००४-२००५ च्या निकषानुसार मूल्यांकनास पात्र ठरविल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) मा.हायकोर्टाने दिनांक ११ ऑक्टोबर, २०१३ च्या आदेशानुसार सदर शाळा अनुदानास पात्र असून त्यांना पूर्वलक्षी प्रभावाने वेतन अदा करावे असे निदेश दिले आहेत काय,

(३) याबाबत शासनाने काय कार्यवाही केली ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) नाही, शासन निर्णय दिनांक ७ फेब्रुवारी, २०१४ नुसार शाळा २०१०-११ पासून १०० टक्के अनुदानास पात्र ठरविण्यात आली असून निधीच्या उपलब्धतेवर अनुदान मंजूर करण्यात येते. पूर्वलक्षी प्रभावाने वेतन अदा करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील कंत्राटी निदेशक, गट निदेशक यांना नियमित करण्याबाबत**

**(३७) * २७७७ श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले, डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक १०२९ ला दिनांक १६ डिसेंबर, २०१४ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील कंत्राटी निदेशक, गट निदेशक यांना नियमित करण्याबाबत व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचेकडून अहवाल प्राप्त झाला आहे काय,

(२) असल्यास, अहवालानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अहवाल प्राप्त झाला नसल्यास त्याची कारणे काय आहेत,

(४) अद्याप शासनाने कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) प्रस्तुत प्रस्तावासंदर्भात कायदेशीर बाबी तपासण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**जळगाव जिल्हयातील ओडीए पाणीपुरवठा योजनेचे वीज बिल थकल्याने योजना बंद असल्याबाबत**

**(३८) * ६५८२ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्हयातील बोदवड तालुक्यातील ३८, मुक्ताईनगर आणि भुसावळ तालुक्यातील ४३ अशा एकूण ८१ गावांना पाणीपुरवठा करुन त्यांची तहान भागवणाऱ्या ओडीए पाणी पुरवठा योजनेचे तब्बल साडे तीन कोटी रुपये इतके वीज बिल थकले असल्याने सदर योजना बंद असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, विजेचे बिल थकल्याची कारणे काय आहेत व ती बिले तातडीने भरुन पाणीपुरवठा प्रस्तावीत होण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या आहेत,

(४) नसल्यास, त्या बाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय हे खरे आहे.

सदरील योजना ही वीज बील थकबाकी व मासीक देयक न भरले मुळे दि. २१.१.२०१५ ते ४.२.२०१५ पर्यंत विद्युत पुरवठा खंडीत केल्यामुळे बंद होती.

(२) होय.

(३) देखभाल व दुरुस्ती निधी अभावी मागील तीन ते चार वर्षापासून मासिक विद्युत देयके वेळेत न भरल्याने ती थकीत राहत आहे. सदरच्या थकबाकीवर महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडुन आकारण्यात येणारे व्याज यामुळे सदरची थकबाकी वाढत असून, सद्यस्थितीत जिल्हा परिषद जळगाव कडून थकबाकी वगळता केवळ मासिक देयके अदा करण्यात येत आहेत.

मासिक देयक थकबाकी सह भरण्यासाठी पाणी पट्टीचे दर वाढविण्यात आले असून वसुलीचे प्रमाण वाढविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहे.

दि. ४.२.२०१५ रोजी सदरच्या योजनेवरील माहे डिसेंबर १४ चे मासिक देयक अदा करुन योजना पुनश्च कार्यान्वित करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**उत्तमसिंग चव्हाण**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.